**जैविक खत व जैविक घटक प्रकल्प**
**वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी**
Biofertilizer and Bio-Agent Production Unit
**Vasantrao Naik Marathwada Krishi Vidyapeeth, Parbhani**
Phone: 02452-234016, Email: hssac.coapbn@gmail.com

जा.क्र. जीपीसी/ ५० /१८
दिनांकः १२.०१.२०१८

# परीपत्रक

जीवाणु खत व जैविक घटक यांची शाश्वत पीक उत्पादनासाठी व जमीनेच आरोग्य जोपासण्यासाठी दिवसेंदिवस मागणी वाढतच आहे. या दृष्टीने मृद विज्ञान व वनस्पती विकृतीशास्त्र विभाग, वनामकृवि, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने सुशीक्षीत बेरोजगारांसाठी चार दिवसीय अनिवासी प्रशिक्षण शिबीर आयोजीत केले आहे. या प्रशिक्षण शिबीरात **"द्रावणीय जैवीक खते व जैविक घटक निर्मीतीचे तंत्रज्ञान"** या संबंधी सुशिक्षीत बेरोजगांरांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

**प्रशिक्षण शिबीरासंबंधी तपशील खालील प्रमाणे आहे :**

१. प्रशिक्षण शिबीर दिनांक २२ ते २५ जानेवारी २०१८ दरम्यान आयोजीत करण्यात येणार आहे.
२. प्रशिक्षण शिबीरात सहभाग नोंदविण्यासाठी प्रशिक्षणार्थी हा विज्ञान शाखेतील पदवीधर/पदव्युत्तर असणे गरजे आहे.
३. प्रशिक्षण शिबीराची नोंदणी शुल्क प्रति प्रशिक्षणार्थी रु. १०००/- आहे.
४. प्रशिक्षण शिबीरासाठी प्रशिक्षणार्थी संख्या कमीतकमी २० व जास्तीत जास्त ३० असणे आवश्यक आहे.
५. प्रशिक्षण शिबीरात सहभागी होण्यासाठी अर्ज हा को-या कागदावर, सोबत पदवीधर/पदव्युत्तर उतीर्ण प्रमाणपत्र आणि प्रशिक्षण शुल्कासह विभाग प्रमुख मृद विज्ञान व कृषि रसायनशास्त्र विभाग, वनामकृवि, परभणी यांच्या नावे देण्यात यावे.
६. प्रशिक्षण शिबीरात सहभाग नोंदविण्याची अंतीम दिनांक १८ जानेवारी २०१८ आहे.

**प्रशिक्षण समन्वयक**

**प्रतः**

१. मा. संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि), वनामकृवि, परभणी यांना माहितीस्तव सादर.
२. मा. सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य, कृषि महाविद्यालय, वनामकृवि परभणी यांना माहितीस्तवा सादर.
३. डॉ. के. टी. आपेट, वनस्पती विकृतीशास्त्र विभाग, वनामकृवि, परभणी यांना माहितीस्तव.
४. प्रभारी अधिकारी, मध्यवर्ती संगणक केंद्र, वनामकृवि, परभणी यांना विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसीध्द करण्यासाठी.